# प्रेसनोट दि.१४/०७/२०१८

## अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेची कामगिरी

## " पुणे शहरात गांजा विक्रीसाठी आलेल्या दोघांजणा विरुध्द अंमली पदार्थ विरोधी पथकाची धडक कारवाईत २० किलो गांजा जप्त "

दि. १३/०७/२०१८ रोजी आम्ही स्वत: व अंमली पदार्थ विरोधी पथकाकडील स्टाफ सरकारी वाहनाने हडपसर पोलीस स्टेशन हद्दीत अंमली पदार्थाचे अनुषंगाने बेकायदेशीर व्यापार करणा-या इसमांबाबत माहिती काढणे कामी पेट्रोलिंग फिरत असतांना २०.४० वा. चे सुमारास, पुणे-सासवड रोडवरील, सासवडकडे जाणा-या बाजुस एम एस ई बी पॉवर हाऊस जवळ,भेकराईनगर,फुरसुंगी येथील देवगिरी हॉस्पिटल समोर, रोडवर सार्वजनिक ठिकाणी इसम नामे, १) युवराज बाळासाहेब जमदाडे,वय – ३० वर्षे,रा.मु.पो.बोराटेवस्ती,जामखेड,ता.जामखेड,जि. अहमदनगर, २) ईश्वर भाऊ पाचारे,वय –२४ वर्षे, रा.मु.पो.घोडेगांव, ता.जामखेड,जि.अहमदनगर असे दोघेजण हे संशयितरित्या पांढ-या रंगाचे टाटा इंडीगो कार क्रं. एम एच १६ ए सी ६६६६ यामध्ये थांबलेले आढळुन आले.

त्यांचेकडे अंमली पदार्थ असल्याचा संशय आल्याने, एनडीपीएस कायदयातील तरतुदींचे पालन करुन,त्यांचेकडील वर नमुद इंडीगो कारची झडती घेतली असता,त्यामध्ये ०२ नायलॉन पोत्यामध्ये २० किलो ८२० ग्रॅम वजनाचा गांजा, रोख रक्कम, वर नमुद इंडीगो गाडी असा एकूण कि.रु.५,१९,३०० मुद्देमाल मिळुन आला. त्याबाबत अंमली पदार्थ विरोधी पथक गुन्हे शाखेकडील मोहन प्रभाकर साळवी सहा पो फौजदार यांनी हडपसर पोलीस ठाणे येथे दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल असुन, नमुद दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई मा.श्री.प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, (गुन्हे) मा.श्री.गायकर, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय -१ पुणे व मा. निलेश मोरे सहा. पोलीस आयुक्त (आर्थिक व सायबर) गुन्हे, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथकाचे प्रमुख पोलीस निरीक्षक सुनिल दोरगे व पोलीस कर्मचारी अविनाश शिंदे,विशाल शिंदे,प्रफुल साबळे, हेमंत वाघमारे, मोहन साळवी, मनोज साळुंके,अमित छडीदार, मिना पिंजण, हेमा ढेबे असे पोलीस स्टाफ यांनी केली आहे.

दाखल गुन्हयाचा पुढील तपास के.एस.लोंढे, सहा. पोलीस निरीक्षक, हडपसर, पो. स्टे. पुणे शहर हे करत आहेत.